# १५ वा वित्त आयोग अंतर्गत Polyclinic करीता कंत्राटी तत्वावर पदभरती जाहीरात

## सन २०२४-२५

१५ वा वित्त आयोग अंतर्गत जिल्हयात **UPHC-HWC उमरेड** येथे Polyclinic सेवा राबविण्याकरीता खालील तक्त्यांमध्ये दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी तत्वावर खालील रिक्त पदांकरीता पात्र उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखतीव्दारे पदभरती करण्यात येत आहेत.

| Sr. No | Specialist | Educationl Qualification | Remuneration per vistit (Rs.) | Total visist in one year | Job Responsibility | Remark |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Physician | MD Medicine/ DNB | 5000 | 50 | 1) Attend the OPD Fixed Schedule.<br>2) OPD timing will be for 4 hours on the fixed date.<br>3) Record of the all cases examined has to be kept by specialist and submitted to the in charge of the HWC<br>4) Medicines are to be prescribed from the availbale medicines from HWC ,and should not be Prescribed from private medical stores.<br>5) Required invistigations will be advised from UPHC/UCHC.<br>6) Counseling and follow up may be given to the patients.<br>7) Patients may be referred to the government facilities as and when required or to the MJPJAY/PMJAY empanelled facilities.<br>8) The clinician has to be available on the decided date and time for the ployclinic OPD,to avoid the inconvenience to the patients.<br>9) Specialist should not call the patients to his/her private hospital. | To visit once in every week.Rs.2000 to be paid as fixed amount per visit + Rs 100 per patient checked of his/her speciality to maximum Rs.5000/visit. |
| 2 | Obstetrics & Gynaecologist | MD/MS Gyn/DGO/ DNB | 5000 | 50 | | |
| 3 | Paediatrician | MD Paed/DCH /DNB | 5000 | 50 | | |
| 4 | Ophthalmologist | MS Opthalmologist/DOMS | 5000 | 26 | | |
| 5 | Dermatologist | MD (Skin/VD), DVD,DNB | 5000 | 26 | | |
| 6 | Psychiatrist | MD Psychiatry /DPM/DNB | 5000 | 26 | | |
| 7 | ENT Specialist | MS ENT/DORL / DNB | 5000 | 26 | | |

**सुचना -**

सविस्तर जाहिरात अटी, शर्ती तथा अर्जासह **www.nagpurzp.com** वर उपलब्ध आहे. तसेच पदभरतीबाबत वारंवार प्रसिध्द होणाऱ्या सुचना हया सर्व कार्यालयाच्या **www.nagpurzp.com** या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येईल कोणत्याही उमेदवारांनी कार्यालयात प्रत्यक्ष येण्याची आवश्यकता नाही.

**आवश्यक कागदपत्रे :-** खालील कागपत्रांची मुळ प्रतीची छायांकिंत प्रत स्वसाक्षांकित करुन अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहील.

१) पदवी /पदविका प्रमाणपत्रे २) गुणपत्रिका (सर्व) ३) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे ४) जातीचे प्रमाणपत्र ५) शाळा सोडल्याचा दाखला/जन्म तारखेचा दाखला ६) प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्र ७) स्पेशालिस्ट पदाकरीता रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट ८) पासपोर्ट आकाराचा फोटो ९) अ.क्र. १ ते ८ पर्यतचे सर्व दस्तऐवज क्रमवारी जोडावेत.

*- प्रत्यक्ष मुलाखतीकरीता उपस्थित राहण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ -*

**राष्ट्रीय आरोग्य अभियान कक्ष, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नागपूर**

**प्रत्यक्ष मुलाखतीचा दिनांक - 17/०4/२०२५ वेळ- सकाळी ११.०० वाजता**

**अटी व शर्ती**

१. वरील सर्व पदे हि **निव्वळ कंत्राटी स्वरुपाची** असुन त्यांचा कालावधी दि. २९/०६/२०२५ पर्यत राहील. हा कालावधी वाढविला जाण्याची शक्यता आहे परंतू सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही.

२. सदर पदे राज्य शासनाची नियमित पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. म्हणून अर्जदाराला शासकिय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३. अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारीरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा, अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४. ज्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती राज्य शासनाच्या नियमित मंजूर रिक्त पदावर करण्यात आली आहे. अशा कर्मचाऱ्यांची सेवा सदर पद रिक्त असेंपर्यत सुरु राहील. नियमित पदे भरले गेल्यास सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा आपोआप तात्काळ संपुष्ठात येईल.

५. अभियान अंतर्गत विविध स्तरावर पदभरती करण्यात येत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती आदेशात नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत असून ही नियुक्ती राष्ट्रीय आरोग्य अभियान प्रकल्प संपुष्ठात येईपर्यत या पैकी जे अगोदर घडेल तो पर्यत करण्यात येत आहे.

६. जिल्हा/परिमंडळ स्तरावरुन नियुक्त करण्यात येणाऱ्या व त्यांचे नियुक्ती/पुनर्नियुक्ती अधिकार जिल्हा/परिमंडळस्तरावर देण्यात आलेले आहेत. अशा कंत्राटी कर्मचाऱ्यांचे कामकाज असमाधानकारक असल्यास कारणे दाखवा नोटीस/ज्ञापण बजावण्यात येईल. संबंधितांनी विहित मुदतीत खुलासा सादर केल्या नंतर खुलासा असमाधानकारक असल्यास नैसर्गिक न्याय तत्वानुसार स्वतःचे बाजू मांडण्याची संधी देण्यात येईल. तद्नंतर असमाधानकारक कामकाजाबाबत खात्री केल्यानंतरच सेवा समाप्तीचे आदेश काढण्यात येईल. सेवा समाप्ती आदेशात त्यांच्या वर लावण्यात आलेल्या दोषारोपाचे व ते दोषारोप सिध्द होत असल्याचा सविस्तर उल्लेख करण्यात येईल.

७. कर्मचाऱ्या संदर्भात आर्थिक अनियमितता अथवा अन्य गंभीर बाबी निदर्शनास आल्यास कारणे दाखवा नोटीस/ज्ञापण बजावण्यात येईल. कर्मचाऱ्याने विहित मुदतीत खुलासा सादर केल्यानंतर खुलासा असमाधानकारक असल्यास नैसर्गिक न्याय तत्वानुसार स्वतःचे बाजू मांडण्याची संधी देण्यात येईल. अंतिमतः कर्मचारी दोषी असल्यास सेवा समाप्तीचा प्रस्ताव राज्य कार्यालयास सादर करण्यात येईल.

८. उपरोक्त सर्व पदासाठीचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.

९. सदर रिक्त पदांच्या संख्येत, ठिकाण व मानधनात बदल होवू शकतो.

१०. उपरोक्त पदाकरीता निवड प्रक्रिया ही राज्यस्तरावरुन प्राप्त मार्गदर्शक सुचनेनुसार घेण्यात येत असल्यामुळे जाहीरातीमधील नमूद दिनांकास विहीत कालावधीत सोबत दिलेल्या अर्ज नमुन्यात मुळ शैक्षणिक कागदपत्राच्या सत्यप्रतीसह या कार्यालयात अर्ज सादर करावा, त्यानंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकारल्या जाणार नाहीत.

११. संबंधित पदाकरीता नोंदणी नंतर पात्र, अपात्र यादी प्रसिध्द दिनांकास कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यासंबंधी आक्षेप असल्यास वरील नमूद प्रमाणे कार्यालयीन वेळेत घेवून निराकरण केले जाईल त्यानंतर प्राप्त आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

१२. अर्जदाराला सोईनुसार पदस्थापनेचे ठिकाण बदलवून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१३. वरीलनुसार ज्या पदाकरीता तत्सम कॉन्सीलकडून रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे तशा पदांकरीता उमेदवाराने सद्यस्थितीत ग्राहय असलेले रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे अन्यथा उमेदवारांस अपात्र ठरवल्या जाईल.

१४. एकापेक्षा जास्त ठिकाणी कार्यरत असल्यास उमेदवाराने अर्ज करण्यात येवू नये. निवड उपरांत तत्सम बाब कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास नियुक्ती तात्काळ रद् करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

१५. पदभरती प्रक्रियेस कार्यालयात उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

१६. जाहीरातीमध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या पदांकरीता खालीलप्रमाणे गुणांकन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

A) Subject Knowledge (10)
B) “Research & Academic Knowledge (10)”
C) Leadership Quality (10)
D) Administrative Abilities (10)
E) Experience (10)
F) For Govt. Experience-2 marks for one year
G) For Private Experience-1 marks for one year

Total Experience-10 marks Maximum. ***एकूण गुण – ५०***

१७. सदर पदाकरीता पात्र उमेदवारांची थेट मुलाखत घेवून निवड करण्यात येईल.

१८. शासकिय सेवानिवृत्त अधिकारी यांचेकरीता वयोमर्यादा ७० वर्ष असेल तसेच अनुभवास प्राधान्य असेल. वर्ग -३ व वर्ग-४ च्या पदावरुन निवृत्त झालेले कर्मचारी कंत्राटी पदावर अर्ज करण्यासाठी दि. १७/१२/२०१६ रोजीच्या शासननिर्णयाव्दारे अपात्र आहेत.

१९. सेवानिवृत्त उमेदवारांना मानधन शासननिर्णय क्र. संकिर्ण -२७१५/प्र.क्र./१००/१३ दि. १७/१२/२०१६ नुसार अदा करण्यात येईल. (गट क व गट ड वगळता)

२०. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालु किंवा प्रस्तावित नसावी किंवा कोणत्याही प्रकारे फौजदारी प्रकरण नसावे.

२१. वैद्यकिय अधिकारी (एम.बी.बी.एस), अति-विशेषतज्ञ आणि विशेषज्ञ यांना ७० वर्ष व अभियानातील इतर रुग्ण सेवेशी संबंधित पदांसाठी (उदा. परिचारीका, अधिपरिचारीका, तंत्रज्ञ, समुपदेशक, औषध निर्माण अधिकारी इ.) सेवा प्रवेश आणि सेवा समाप्तीची वयोमर्यादा ६५ वर्ष राहील.

२२. लहान कुटुंब अट हि दि. २३/०७/२०२० पासून लागू करण्यात येत असून, दि. २३/०७/२०२० पासून दोनपेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या कंत्राटी पदभरतीसाठी अर्ज करण्यास पात्र ठरणार नाहीत. यापुढे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सर्व स्तरांवर कंत्राटी पदभरती करतांना लहान कुटुंबाच्या अटीचे काटेकोरपणे पालन करुन जाहिरातीमध्ये आवश्यक ती अट नमूद केली जावी. (**अधिक माहितीस्तव दि. २३/०७/२०२० रोजीचे परिपत्रक पहावे**).

२३. संपूर्ण निवडप्रकिया ही गुणवत्तेवर आधारीत पारदर्शी पध्दतीने घेण्यात येईल.

२४. भरती प्रक्रिया स्थगिती देणे/रद् करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष, निवड समिती, रा.आ.अ. नागपूर यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

**सदस्य सचिव**
जि.ए.आ.व कु.क.सो.
तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, नागपूर

**अध्यक्ष**
जि.ए.आ.व कु.क.सो.
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नागपूर